NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
(संलग्नता विभाग)

# परिपत्रक

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक ०४/०७/२०१७ रोजीचा शासन निर्णय क्रमांक: एनजीसी - २०१७/(१२८/१७)/मशि-४ अन्वये उच्च माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याचे वाढते प्रमाण व विद्यार्थ्यांच्य विशिष्ट अभ्यासक्रमाकडे असलेला कल विचारात घेवून कोणताही विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (८) मधील तरतूदीनुसार असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या अतिरिक्त नवीन तुकडयांना जलदगती पध्दतीने मंजूरी देण्याबाबतची कार्यपध्दती व निकष विहित केलेले आहेत.

त्याअनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना आदेशान्वये कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी दिनांक ०४/०७/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने जलदगती तुकडी मागणी संदर्भात प्रस्ताव सादर करावयाचे आहेत, अशा महाविद्यालयांनी ०३ प्रतित प्रस्ताव दिनांक १०/०७/२०२५ पर्यंत विद्यापीठास सादर करावेत.

- दिनांक ०४/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील **परिशिष्ट-अ** अन्वये प्रस्तावाचा अर्ज सादर करावा.
- परिशिष्ट-ब मध्ये नमूद केलली कागदपत्रे पृष्ठ क्रमांकासह अर्जासोबत जोडण्यात यावीत.
- परिशिष्ट-क मधील तपशिल विद्यापीठाने शासनाने सादर करावायाचा असला तरी, सदरचा तपशील महाविद्यालय व संबंधित महाविद्यालय असलेल्या तालुक्याशी निगडीत असल्यामुळे परिशिष्ट-क मध्ये नमूद केलेल्या रकाना क्र. १ ते १३ पैकी अ.क्र. ३ व १३ वगळता उर्वरित माहिती महाविद्यालयांनी तपशीलवारव सुस्पष्ट भरून त्यावर महाविद्यालयाच्या मा. प्राचार्यांची स्वाक्षरी व शिक्का असणे आवश्यक आहे.
- जलदगती तुकडीचा प्रस्ताव सादर करताना जी महाविद्यालये नॅक मुल्यांकन/पुनर्मूल्यांकनाकरिता पात्र आहेत, अशा महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन/पुनर्मूल्यांकन करून घेणे आवश्यक आहे.
- ज्या अभ्यासक्रमांना शिखर परिषदेची (Apex Body) मान्यता आवश्यक आहे. अशा महाविद्यालयांनी जलदगती तुकडीचे प्रस्ताव सादर करून नयेत.

या परिपत्रकाच्या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांवर विहित कार्यवाही करून पात्र ठरलेले प्रस्ताव विद्यापीठाच्या शिफारशीसह शासनास सादर करण्यात येतील व शासन मान्यतेनंतर सदर बाब संबंधित महाविद्यालयांस अवगत करण्यात येईल.

(डॉ. उ. वि. मेटकरी)
उपकुलसचिव

जा.क्र. : पुअहोसोविसो/संलग्नता/जलदगती तुकडी/२०२५-२६/ 5099

दिनांक : 1 JUL 2025

सोबत :- दिनांक ०४/०७/२०१७ रोजीचा शासन निर्णय.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या नवीन अतिरिक्त तुकड्यांना मंजुरी देण्याबाबतची जलदगती कार्यपद्धती आणि त्यासंबंधीचे निकष विहित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन निर्णय क्रमांक : एनजीसी-२०१७/(१२८/१७)/मशि-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ०४ जुलै, २०१७.

**वाचा :** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दिनांक ०१ मार्च, २०१७ पासून अंमलात आलेला आहे. उच्च माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याचे वाढते प्रमाण व विद्यार्थ्यांचा विशिष्ट अभ्यासक्रमाकडे असलेला कल विचारात घेता, कोणताही विद्यार्थी इच्छित उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये, हे विचारात घेऊन या अधिनियमातील कलम १०९ (८) मध्ये असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या अतिरिक्त नवीन तुकड्यांना जलदगती पद्धतीने मान्यता देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. अशा प्रकारे जलदगती पद्धतीने विशिष्ट विद्याशाखांच्या अतिरिक्त नवीन तुकड्यांना मान्यता देण्यासंदर्भातील निकष आणि कार्यपद्धती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या नवीन जलदगती अतिरिक्त तुकड्यांना मान्यता देण्याकरीता पुढीलप्रमाणे कार्यपद्धती व निकष विहित करण्यात येत आहेत :-

**कार्यपद्धती :-**

१. ज्या महाविद्यालयांना जलदगती अतिरिक्त तुकडीसाठी अर्ज करावयाचा आहे, त्यांनी तो अर्ज या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **"परिशिष्ट-अ"** मधील अर्जाच्या नमुन्यात संबंधित अकृषी विद्यापीठाकडे सादर करावा व **"परिशिष्ट-ब"** मध्ये नमूद केलेली कागदपत्रे अर्जासोबत जोडण्यात यावीत.
२. अर्ज स्वीकारण्याची कार्यपद्धती व अर्ज कोणत्या दिनांकापर्यंत स्वीकारावयाचे या संदर्भात संबंधित अकृषी विद्यापीठांनी स्वतंत्र सूचना निर्गमित कराव्यात. अशा सूचना निर्गमित करताना विद्यापीठाकडून असे प्रस्ताव शासनाकडे त्या शैक्षणिक वर्षाच्या दिनांक १० ऑगस्ट पर्यंतच सादर होणे आवश्यक असल्याची बाब विचारात घेण्यात यावी.

३. अकृषी विद्यापीठांनी विहित नमुन्यात अर्ज स्वीकारावेत. अर्जात भरण्यात आलेली माहिती व त्यासोबत जोडणे आवश्यक असलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी एक तपशील सूची तयार करुन त्याप्रमाणे आवश्यक बाबींची पूर्तता करणारेच अर्ज विचारात घेण्यात यावेत.

४. राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षांचे निकाल घोषित झाल्यानंतर सर्व अकृषी विद्यापीठांनी त्यांच्या परिक्षेत्रातील उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची जिल्हानिहाय टक्केवारी, महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या विद्याशाखानिहाय जागा, विद्यार्थ्यांची अभ्यासक्रमासाठी असलेली मागणी याचा आढावा घ्यावा.

५. उपरोक्तप्रमाणे आढावा घेतल्यानंतर विद्यार्थी प्रवेशाविना वंचित राहत आहेत व महाविद्यालयांची जलदगती अतिरिक्त तुकड्यांची मागणी आहे, हे विचारात घेऊन संबंधित अकृषी विद्यापीठाने त्यांच्याकडे जलदगती अतिरिक्त तुकडीकरिता प्राप्त झालेले प्रस्ताव शासनाने विहित केलेल्या निकषांप्रमाणे तपासून **"परिशिष्ट-क"** सह विद्यापीठाच्या मंजुरीच्या शिफारशीसह कोणत्याही परिस्थितीत त्यावर्षीच्या दिनांक १० ऑगस्टपर्यंत शासनास सादर करावेत. या दिनांकानंतर प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

६. जलदगती अतिरिक्त तुकडयांकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठविताना, त्या परिसरातील भौगोलिक परिस्थिती, उपलब्ध विद्याशाखांमधील प्रवेश क्षमता, निकालाची टक्केवारी, विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहतील, अशी निर्माण झालेली परिस्थिती याचा आढावा घेतल्यानंतर, असामान्य परिस्थितीत विशिष्ट विद्याशाखांच्या जलदगती अतिरिक्त नवीन तुकड्या सुरु करणे समर्थनीय असेल, त्याबाबतीत कारणे लेखी नमूद करुन विद्यापीठ राज्य शासनाकडे विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार प्रस्ताव सादर करेल. समर्थनीय नसेल अशा प्रस्तावांची राज्य शासनाकडे शिफारस करण्यात येऊ नये.

७. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (८) अनुसार अशा असामान्य परिस्थितीत परवानगी देण्याची कार्यपद्धती ही, ज्या शैक्षणिक वर्षात अशा नवीन तुकड्या सुरु करावयाच्या असतील त्यावर्षाच्या ३१ ऑगस्टच्या आत पूर्ण करण्यात येईल. ज्या शैक्षणिक वर्षात अशा नवीन तुकड्या सुरु करावयाच्या असतील त्या शैक्षणिक वर्षाच्या ३१ ऑगस्टपर्यंत राज्य शासनाकडून कोणत्याही स्वरुपाची प्रतिकूल माहिती कळविण्यात आली नाही, तर अशी परवानगी राज्य शासनाकडून मिळाली असल्याचे मानण्यात येईल.

निकष :-

१. जी महाविद्यालये जलदगती अतिरिक्त तुकडी मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करतील त्यांच्याबाबतीत पुढील पूर्तता नसलेल्या महाविद्यालयांचे अर्ज शासनाकडे शिफारशीत करण्यात येऊ नयेत :-

अ) मूल्यांकन/पुनर्मूल्यांकनाकरिता पात्र महाविद्यालयांच्याबाबतीत नॅक/एनबीए मानांकन व मूल्यांकन तसेच, पुनर्मूल्यांकन करुन घेतले नसेल तर,

**आ)** ज्या विद्याशाखेची जलदगती अतिरिक्त तुकडी मंजूर करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, त्या विद्याशाखेच्या मुळ तुकडीच्या सर्व विषयांकरिता अर्हताधारक अध्यापक उपलब्ध नसतील तर तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार भौतिक सुविधा उपलब्ध नसतील तर.

२. ज्या विद्याशाखेच्या जलदगती अतिरिक्त तुकडीकरीता मागणी करण्यात आलेली आहे, त्या तुकडीत प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता शासनाने नियमित तुकडीकरिता विहित केलेल्या निकषांप्रमाणे, भौतिक साधने व अध्यापक वर्ग उपलब्ध आहे किंवा त्यासाठी तात्पुरती व्यवस्था करण्यात आलेली आहे, यासंदर्भातील तपशीलवार प्रमाणपत्र महाविद्यालयाने अर्जासोबत जोडणे आवश्यक असून, विद्यापीठानेही ही बाब प्रमाणित करावी. ज्या महाविद्यालयांनी तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्था केलेली आहे, त्या महाविद्यालयांनी पुढील ६ महिन्यात शासनाने नियमित तुकडीकरीता विहित केलेल्या निकषांची पुर्तता करण्यात येईल, असे हमीपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. तसेच, पुढील ६ महिन्यात या निकषांची पूर्तता करण्यात आल्यानंतर पूर्ततेचे प्रमाणपत्र विद्यापीठामार्फत (निकष पूर्ण केल्याचे विद्यापीठाने प्रमाणित करुन) शासनाकडे सादर करणे आवश्यक राहील.

३. महाविद्यालयामध्ये विद्याशाखा अस्तित्वात नसेल तर जलदगती अतिरिक्त तुकडीद्वारे अशी विद्याशाखा सुरु करता येणार नाही. ज्या महाविद्यालयांमध्ये त्या विद्याशाखेची मूळ तुकडी शासन मान्यतेने सुरु आहे, अशा विद्याशाखेच्या अतिरिक्त तुकडीचा प्रस्ताव जलदगती पद्धतीने विचारात घेता येईल.

४. अशा प्रकारे जलदगतीने मान्यता दिलेली अतिरिक्त तुकडी नैसर्गिक वाढीने पुढे चालू राहील. मात्र अशा तुकडीस पुढील शैक्षणिक वर्षामध्ये नियमित शासन मान्यता प्राप्त न झाल्यास सदर तुकडीमध्ये प्रथम वर्षाकरीता विद्यार्थी प्रवेशित करता येणार नाही. पुढील शैक्षणिक वर्षाकरिता अशा नियमित अतिरिक्त तुकडीकरिता शासनाने विहित केलेल्या निकष व कार्यपद्धतीनुसार नव्याने अर्ज सादर करुन शासन मान्यता घेणे आवश्यक राहील.

५. जलदगती अतिरिक्त तुकडी ज्या शैक्षणिक वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेली आहे त्या शैक्षणिक वर्षामध्ये त्या तुकडीमध्ये विद्यार्थी प्रवेशित न झाल्यास तसेच, काही अन्य कारणांमुळे तुकडी सुरु न झाल्यास अशा तुकडीची मान्यता आपोआप रद्द झाली असे समजण्यात येईल.

६. ज्या जलदगती अतिरिक्त तुकडीस मान्यता देण्यात आलेली आहे, अशा तुकडीमध्ये मंजूर विद्यार्थी संख्येच्या ५० टक्के विद्यार्थी प्रवेशित होतील, याची दक्षता घेण्यात यावी.

७. ज्या अभ्यासक्रमांना शिखर परिषदेची (Apex Body) मान्यता आवश्यक आहे, अशा अभ्यासक्रमांच्या विद्याशाखांना जलदगती अतिरिक्त तुकडी मंजूर करता येणार नाही.

८. ज्या अभ्यासक्रमांकरीता ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया विहित केलेली आहे, त्या अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेकरीता महाविद्यालयांनी नोंदणी करावयाची

तारीख संपुष्टात आली असेल, तर त्यानंतर जलदगती अतिरिक्त तुकडी मंजूर करता येणार नाही.

९. संबंधित विद्याशाखेमध्ये विद्यार्थी प्रवेशित करण्याकरिता शासनाने जी कार्यपद्धती विहित केलेली आहे, त्या कार्यपद्धतीद्वारेच अशा जलदगती अतिरिक्त तुकडीमध्ये विद्यार्थी प्रवेशित केले जातील. तसेच, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अतिरिक्त जलदगती तुकडीची मान्यता ही कायम विनाअनुदानित तत्वावर राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०१७०७०४१३१००७६९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=440c600559857f4234e969f892346c88247ac81346a1b7229bf9917deb7bce48, cn=Rohini Bhalekar
Date: 2017.07.04 18:10:20 +05'30'

(रोहिणी भालेकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) मा. मंत्री (उ. व तं. शि.) यांचे विशेष कार्य अधिकारी.
४) मा. राज्यमंत्री (उ. व तं. शि.) यांचे खाजगी सचिव.
५) अपर मुख्य सचिव (उ. व तं. शि.) यांचे स्वीय सहायक.
६) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
७) विशि-३, विशि-४ कार्यासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय.
८) निवड नस्ती (मशि-४)

**शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(१२८/१७)/मशि-४, दि. ०४ जुलै, २०१७.**

*** परिशिष्ट-अ ***

## अतिरिक्त जलदगती तुकडीकरीता अर्जाचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता :<br>(दुरध्वनी क्रमांकासह) | |
| २. | महाविद्यालयाचे नाव आणि पूर्ण पत्ता : | |
| ३. | ज्या महाविद्यालयात अतिरिक्त जलदगती तुकडी सुरु करावयाची आहे, त्या ठिकाणाची लोकसंख्या : | |
| ४. | महाविद्यालयात अतिरिक्त जलद गतीने तुकडी सुरु करावयाचे सत्र : | |
| ५. | अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, वाढीव तुकडया अस्तित्वात असल्यास त्याचा तपशील : | |

| | ✓ | विषय | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| विद्याशाखा | | | |
| अभ्यासक्रम | | | |
| विषय | | | |
| तुकडया | | | |

६. आवेदन शुल्क रुपये-----/-, धनाकर्ष क्र.----------------.
दिनांक -----------------.
बँकेचे नाव---------------------.
(धनाकर्ष कुलसचिव,-----------------------विद्यापीठ, यांचे नावे असावा.)

७. महाविद्यालयात अतिरिक्त जलदगती तुकडी सुरु करावयाच्या विद्याशाखेचा तपशिल :

| अ.क्र. | शाखा | अभ्यासक्रम | अध्यापनाचे माध्यम | अध्यापनाचे विषय |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |

८. संस्थेचा पंजीयनाचा क्रमांक -------- व दिनांक -----------

९. संस्थेच्या संविधानात शैक्षणिक बाबींसंबंधी तरतूद असल्यास त्या तरतुदींच्या कलम क्र. व तद्नुसार नवीन अतिरिक्त जलदगती तुकडी सुरु करण्यासंबंधीचा संस्थेचा ठराव क्र.----- व दिनांक ---------

१०. महाविद्यालयात सुरु करणार असलेल्या प्रस्तावित अतिरिक्त जलदगती तुकडीतील विषय महाविद्यालयाच्या १५ कि.मी. परिसरातील इतर महाविद्यालयात शिकविले जात असल्यास मागील ०३ वर्षांचा अभ्यासक्रम, विषय व तुकडयांच्या वस्तुस्थितीचा महाविद्यालयांच्या नावासह तपशील :

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

(जागा कमी पडल्यास स्वतंत्र वेगळया कागदावर पुरविण्यात यावी.)

| | |
|---|---|
| ११. | आपण सुरु करणार असलेल्या नविन अतिरिक्त जलदगती तुकडीमुळे व उल्लेखित परिसरातील इतर महाविद्यालयाशी अवास्तव स्पर्धा निर्माण होईल काय ? ---------------------------------------- |
| १२. | निरनिराळ्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षात प्रवेशेच्छुक विद्यार्थ्यांची अंदाजित संख्या : |

| कला | वाणिज्य | विज्ञान | विधि | इतर |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | |
|---|---|
| १३. | १५ कि.मी. परिसरातील अस्तित्वात असलेल्या उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची मागील ०३ वर्षांची पुढील संदर्भात माहिती द्यावी : |

| अ. क्र. | शाळेचे/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व पत्ता | वर्ष | उच्च माध्यमिक परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | उत्तीर्ण विद्यार्थ्यांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |

| | |
|---|---|
| १४. | कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेच्या अतिरिक्त जलदगती तुकडी ज्या महाविद्यालयात सुरु करावयाची आहे, ते ठिकाण १२ वी च्या परीक्षेचे केंद्र आहे काय ? ---------------------------------------------------------------------- |
| १५. | केंद्र असल्यास तेथून १२ वी च्या मार्च व ऑक्टोबरच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची कला, वाणिज्य, विज्ञान शाखानिहाय संख्या ------------------------------------------------------ |
| १६. | अ) संस्थेद्वारा चालविल्या जाणाऱ्या शाळा व महाविद्यालये यांचा तपशिल------------------------<br>ब) सदर शाळा व महाविद्यालयांची मान्य प्रवेश क्षमता, प्रत्यक्ष प्रवेशित व परीक्षेस बसलेले विद्यार्थी ------------------------------------------------------------------------------------------ |
| १७. | अ) महाविद्यालयासाठी वापरल्या जाणाऱ्या इमारतीच्या खोल्यांची संख्या व आकार ---------------<br>ब) सदर इमारत खोल्यांमध्ये सध्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक किंवा इतर अभ्यासक्रमाचे वर्ग भरतात काय? -------------- -------- असल्यास त्याचा तपशील -------------------------- |
| १८. | अर्ज केलेल्या वर्षातील ३१ मार्चला असलेली संस्थेची आर्थिक स्थिती :-<br>(अ) स्थावर मालमत्ता<br>(ब) जंगम मालमत्ता<br>(क) बँकेतील रोख<br>(ड) बँकेचे वा इतर कर्ज |
| १९. | वरील उल्लेखित बाबींशिवाय महाविद्यालयाच्या आकस्मिक व अनाकस्मिक खर्चासाठी करण्यात येणाऱ्या आर्थिक तरतुदींचा तपशील : ------------------------------------------------ |

- परिशिष्ट-ब मध्ये नमूद केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडण्यात यावीत.

मूळ सही (शिक्क्याची नाही)
अध्यक्ष
(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)

मूळ सही (शिक्क्याची नाही)
सचिव
(संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता)

शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(१२८/१७)/मशि-४, दि. ०४ जुलै, २०१७.

## * परिशिष्ट-ब *

संस्थेचे नाव :- विद्यापीठाचे नाव :

ठिकाण :- विद्याशाखा :-

| अ.क्र. | तपासणी सूची | पुर्ततेचा "तपशील" (होय/नाही) | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | संस्थेचा नविन अतिरिक्त जलदगती तुकडी मंजुरीसाठीचा विहित नमुन्यात अर्ज. | | |
| २. | संस्था नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. | | |
| ३. | चालू वर्षाच्या तपशिलवार अंदाजपत्रकाची प्रत. | | |
| ४. | संस्थेच्या मागील वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची प्रत. | | |
| ५. | शासनाचे कायम विना अनुदानित धोरण लक्षात घेता, अर्जासोबत मंजुर अतिरिक्त तुकडीसाठी नियमानुसार वेतन व वेतनेतर खर्च संस्था करणार असल्याबाबतचे रु.१००/- च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र. | | |
| ६. | अस्तित्वात असणाऱ्या महाविद्यालयाच्या इमारतीत विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केल्यानुसार सेमीनार रुम, लेक्चर रुम, लायब्ररी, प्रयोगशाळा यासाठी किमान आवश्यक जागा या संदर्भातील प्रमाणित कागदपत्रे. | | |
| ७. | महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेत निर्धारित आवश्यक सामग्री (विज्ञान विद्याशाखेसाठी) | | |
| ८. | ग्रंथालयात पुस्तकांची सुविधा (मागणी केलेल्या तुकडीकरिता किमान १०० अतिरिक्त पुस्तके) | | |
| ९. | प्रस्तावित महाविद्यालयाच्या इमारतीतील सेमिनार रुम, लेक्चर रुम, फॅकल्टी रुम, स्टाफ रुम, प्राचार्यांची रुम, कॉमन रुम, हॉस्टेल रुम इत्यादी ठिकाणी आवश्यक फर्निचर. | | |
| १०. | ज्या विद्याशाखेच्या जलदगती अतिरिक्त तुकडीची मागणी केली आहे, त्या विद्याशाखेच्या मुळ तुकडीच्या सर्व विषयांकरीता अर्हताधारक अध्यापक उपलब्ध आहेत तसेच, शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार मूलभूत भौतिक सुविधा उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र व संपूर्ण तपशिल. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | ज्या विद्याशाखेच्या जदलगती अतिरिक्त तुकडीची मागणी करण्यात आलेली आहे, त्याकरिता भौतिक व मूलभूत साधने / पात्रताधारक अध्यापक उपलब्ध आहेत किंवा तात्पुरती व्यवस्था केलेली आहे त्याबाबतचे विद्यापीठाने प्रमाणित केलेले महाविद्यालयाचे तपशिलवार प्रमाणपत्र. | | |
| १२. | ज्या महाविद्यालयांनी तात्पुरत्या स्वरुपात व्यवस्था केलेली आहे, त्या महाविद्यालयांनी पुढील ६ महिन्यात शासनाने नियमित तुकडीकरीता विहित केलेल्या निकषांची पूर्तता करण्यात येईल, असे हमीपत्र. | | |
| १३. | मुल्यांकन/पुनर्मूल्यांकनाककरिता पात्र असल्यास नॅक/ एनबीए मानांकन व मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन करुन घेतले असल्याचे प्रमाणपत्र. | | |
| १४. | ज्या विद्याशाखेची अतिरिक्त जलदगती तुकडीची मागणी केली आहे, त्यास शिखर परिषदेच्या मान्यतेची आवश्यकता आहे काय, | | |
| १४. | ज्या विद्याशाखेची अतिरिक्त जलदगती तुकडीची मागणी केली आहे, त्या विद्याशाखेच्या प्रवेशाची कार्यपद्धती. ऑनलाईन प्रवेश करण्यात येत असल्यास त्याचा तपशील. | | |

शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(१२८/१७)/मशि-४, दि. ०४ जुलै, २०१७.

* परिशिष्ट - क *

| अ.क्र. | विद्यापीठाने द्यावयाचा तपशिल | |
|---|---|---|
| १. | संस्थेचे नाव व पूर्ण पत्ता. | |
| २. | प्रस्तावित जलदगती तुकडीच्या विद्याशाखेचा तपशील. | |
| ३. | विद्यापीठांनी केलेली शिफारस. | |
| ४. | विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या मूलभूत सुविधा संस्थेने महाविद्यालयांसाठी उपलब्ध केल्या आहेत काय? असल्यास, त्याचा तपशील. | |
| ५. | संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे ? | |
| ६. | ज्या तालुक्यामधील महाविद्यालयात अतिरिक्त जलदगती तुकडी मागितली आहे, त्या तालुक्यातील इतर महाविद्यालयात अस्तित्वात असणाऱ्या तुकड्यांवर विपरीत परिणाम होईल किंवा कसे, | |
| ७. | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांची नावे व महाविद्यालयांमधील अंतर. | |
| ८. | तालुक्यामध्ये अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांतील विद्याशाखेंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या विषयाचे गट (व्यावसायिक अभ्यासक्रमांची स्वतंत्र माहिती द्यावी) | |
| ९. | गटनिहाय विद्यार्थी संख्या (व्यावसायिक अभ्यासक्रमाची स्वतंत्र माहिती द्यावी) | |
| १०. | तालुक्यामध्ये महाविद्यालय शाळांमधुन १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्याशाखानिहाय विद्यार्थ्यांची संख्या. | |
| ११. | मागील वर्षी किती विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिले ? | |
| १२. | ज्या विद्याशाखेची अतिरिक्त जलदगती तुकडी प्रस्तावित केली आहे, परिसरात त्या विद्याशाखेच्या किती तुकड्या आहेत ? त्यामध्ये प्रवेशित मागील / चालू वर्षाची विद्यार्थी संख्या, त्या विद्याशाखेस असलेली विद्यार्थ्यांची मागणी, परिसरातील त्या विद्याशाखेची प्रवेश क्षमता संपृष्टात आल्यानंतरही विद्यार्थी प्रवेशाविना वंचित रहात आहेत, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे काय ? याची या संदर्भातील तपशीलवार माहिती. | |
| १३. | नवीन अतिरिक्त जलदगती तुकडी सुरु करण्यास परवानगी द्यावी किंवा कसे याबाबतचे विद्यापीठाचे स्वयंस्पष्ट अभिप्राय (समर्थनीय कारणांसह) | |

विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकाऱ्याची
सही व शिक्का